जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 5 AUG 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज क्रांतिअग्रणी डॉ. जी.डी. लाड अध्यासनाचा प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. (बापू) लाड अध्यासन स्थापित आहे. त्यानिमित्त सोमवारी (दि. २५) सकाळी ११.३० वाजता राजर्षी शाहू सभागृहात विशेष व्याख्यान होणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांचे 'भारतीय स्वातंत्र्यलढा व जी.डी. (बापू) लाड' या विषयावर व्याख्यान होईल. तसेच शाहीर सदाशिव निकम यांचा शाहिरी कार्यक्रम होणार आहे. विधान परिषदेचे सदस्य अरुण लाड व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 AUG 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राइव्हमधून निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामध्ये आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पस ड्राइव्हला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कॅम्पस ड्राइव्हमध्ये विविध कंपन्यांनी सहभाग नोंदविला. या कंपन्यांनी ४० विद्यार्थ्यांची निवड केली. त्यांना स्कॉलरशिप व इंटर्नशिपसह प्रशिक्षणाची संधी दिली आहे. या प्रशिक्षण संस्थांकडून विद्यार्थ्यांना नवीनतम तंत्रज्ञानांवर प्रशिक्षण दिले जाणार आहे. तंत्रज्ञान अधिविभागातील उद्योग संस्थेने २० विद्यार्थ्यांची निवड केली आहे. या विद्यार्थ्यांना इंडस्ट्रीमध्ये अंतिम वर्षाचे प्रोजेक्ट पूर्ण करताना पेड इंटर्नशिपची संधी दिली जाणार आहे. या कॅम्पस ड्राईव्हमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप, इंटर्नशिप व उद्योग क्षेत्राचा थेट अनुभव घेण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे. विद्यार्थ्यांनी लेखी परीक्षा, तांत्रिक मुलाखत व व्यक्तिमत्व चाचणी अशा टप्प्यांमधून हे यश संपादन केले. विभागाचे संचालक प्रा. डॉ. अजित कोळेकर यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले. विभागाचे प्लेसमेंट सेल अधिकारी डॉ. गणेश पाटील, अमर डूम, डॉ. चेतन आवटी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 5 AUG 2025
लोकमत

# विद्यापीठाची स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र प्रवेश प्रक्रिया सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठ अनुदान आयोग योजनेंतर्गत एस. सी., एस. टी., ओबीसी., ई. डब्ल्यू. एस. (नॉन क्रिमीलेअर) व अल्पसंख्याक (मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, आणि जैन) आणि खुल्या गटातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश परीक्षा अर्ज ऑफलाइन पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

अर्ज शिवाजी विद्यापीठाचे संकेतस्थळ, युजीसी सेंटर फॉर कोचिंग फॉर कॉम्पेटिटिव्ह एक्झामिनेशन्सवर उपलब्ध आहेत. तसेच प्रवेश परीक्षा अर्ज केंद्राच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. २१ ते ३० ऑगस्टपर्यंत प्रवेश अर्ज आवश्यक कागदपत्रांसह केंद्राच्या कार्यालयात सकाळी १०:३० ते ६:०० पर्यंत जमा करावेत. प्रवेश परीक्षा ९ सप्टेंबर रोजी ऑफलाइन पद्धतीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात घेण्यात येईल, असे डॉ. प्रकाश कांबळे यांनी सांगितले.